पुढारी

# शिवाजी विद्यापीठाचा देशात झेंडा

## जागतिक क्यू.एस.रँकिंगमधील मानांकन जाहीर ; संशोधनात दुसरा क्रमांक

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाने संशोधनामध्ये राष्ट्रीय पातळीवर द्वितीय स्थान पटकावून या क्षेत्रातील आपले प्रभुत्व पुन्हा एकदा सिद्ध केले आहे. शैक्षणिक संस्थांच्या मूल्यांकनात जागतिक स्तरावर दबदबा असलेल्या ब्रिटिश क्यू. एस. वर्ल्ड युनिव्हर्सिटी रँकिंगचे भारतीय संस्थांच्या संदर्भातील मानांकन १५ ऑक्टोबर रोजी जाहीर करण्यात आले. यामध्ये शिवाजी विद्यापीठाने संशोधन क्षेत्रात आघाडी सिद्ध केली असल्याची माहिती बुधवारी (दि. १७) कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

क्यू. एस. वर्ल्ड युनिव्हर्सिटी रँकिंगच्या वतीने ब्रिक्स (ब्राझील, रशिया, भारत, चीन आणि दक्षिण आफ्रिका) देशांसाठी स्वतंत्र रँकिंग घेण्यात आले. या क्यू. एस. ब्रिक्स इंडिया रँकिंगनुसार प्रथमच भारतातील शैक्षणिक संस्थांसाठी स्वतंत्रपणे क्रमवारी जाहीर केली. यामध्ये भारतातील सर्व शैक्षणिक संस्थांमध्ये शिवाजी विद्यापीठाची क्रमवारी ५६-६० अशी अव्वल आहे, तर ब्रिक्स देशांतील शैक्षणिक संस्थांमध्ये ही क्रमवारी २५१-२६० अशी आहे. या निकषांवर मुंबईच्या इन्स्टिट्यूट ऑफ केमिकल टेक्नॉलॉजीने (आय.सी.टी.) प्रथम स्थान पटकावले आहे.



**नवी दिल्ली : नीती आयोगाचे उपाध्यक्ष डॉ. राजीव कुमार आणि क्यू. एस. रँकिंगचे उपाध्यक्ष जेसन न्यूमन यांच्या हस्ते क्यू. एस. रँकिंगचे प्रमाणपत्र स्वीकारताना शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे.**

> *जागतिक संशोधन संस्थांच्या क्रमवारीच्या क्षेत्रात थिंक टँक म्हणून प्रसिद्ध असणाऱ्या ब्रिटनच्या क्यू.एस. वर्ल्ड युनिव्हर्सिटी रँकिंगमध्ये शिवाजी विद्यापीठाच्या संशोधनाचा गौरव होणे हा विद्यापीठाच्या संशोधन परंपरेचा सन्मान आहे. या निमित्ताने विद्यापीठाच्या संशोधन कार्याची नोंद प्रथमच एका जागतिक क्रमवारी निर्धारित करणाऱ्या यंत्रणेमार्फत घेण्यात आली आहे.*
>
> **– कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे**

### प्रमाणपत्र प्रदान कार्यक्रम

*या रँकिंगच्या प्रमाणपत्र प्रदानाचा कार्यक्रम नवी दिल्ली येथे १५ ऑक्टोबर रोजी झाला. कुलगुरू डॉ. शिंदे यांना नीती आयोगाचे उपाध्यक्ष डॉ. राजीव कुमार आणि क्यू. एस. रँकिंगचे उपाध्यक्ष जेसन न्यूमन यांच्या हस्ते प्रमाणपत्र देण्यात आले. यावेळी अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे संचालक डॉ. आर. के. कामत उपस्थित होते.*

### ...असे ठरवण्यात आले मानांकन

*शैक्षणिक लौकिक (३०%), संस्थेचा लौकिक व परंपरा (२०%), शिक्षक-विद्यार्थी गुणोत्तर (२०%), पीएच.डी.धारक शिक्षक (१०%), स्कोपस आकडेवारीनुसार प्रतिशिक्षक शोधप्रबंध (१०%), स्कोपसनुसार शोधनिबंधांमधील साइटेशन्स (५%), आंतरराष्ट्रीय विद्यार्थ्यांचे प्रमाण (२.५%) आणि आंतरराष्ट्रीय शिक्षकांचे प्रमाण (२.५%).*

सकाळ

# शिवाजी विद्यापीठ संशोधनात दुसरे

## ब्रिक्स देशांतील मूल्यांकन जाहीर

कोल्हापूर, ता. १७ : शैक्षणिक संस्थांच्या मूल्यांकनात जागतिक स्तरावर दबदबा निर्माण करणाऱ्या 'क्यू.एस. वर्ल्ड युनिव्हर्सिटी रँकिंग'तर्फे ब्रिक्स देशांमधील (ब्राझील, रशिया, भारत, चीन आणि दक्षिण आफ्रिका) संस्थांचे स्वतंत्र मूल्यांकन जाहीर करण्यात आले. यात संशोधन या निकषावर देशातील दोन संस्था निवडल्या असून यात शिवाजी विद्यापीठाला दुसरा क्रमांक मिळाला, अशी माहिती कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी आज पत्रकार परिषदेत दिली.

कुलगुरू शिंदे म्हणाले, ''क्यू. एस. वर्ल्ड युनिव्हर्सिटी रँकिंग' हे आंतरराष्ट्रीय स्तरावरील प्रतिष्ठेचे मानांकन आहे. संशोधनाशी निगडित निकषांवर संस्थांना मानांकन दिले जाते. यंदा 'क्यू.एस. वर्ल्ड युनिव्हर्सिटी रँकिंग'तर्फे ब्रिक्स देशांमधील (ब्राझील, रशिया, भारत, चीन आणि दक्षिण आफ्रिका) संस्थांचे स्वतंत्र मूल्यांकन जाहीर झाले. यात भारतातील संस्थांत शिवाजी विद्यापीठाची क्रमवारी ५६-६० अशी आहे. ब्रिक्स देशांतील शैक्षणिक संस्थांत ही क्रमवारी २५१-२६० अशी आहे. संशोधनाशी निगडित निकषांवर शिवाजी विद्यापीठाने राष्ट्रीय स्तरावर द्वितीय क्रमांक मिळवला. पहिला क्रमांक मुंबईच्या इन्स्टिट्यूट ऑफ केमिकल टेक्नॉलॉजीने (आय. सी.टी.) प्रथम स्थान पटकावले आहे.'' रँकिंगच्या प्रमाणपत्र प्रदानाचा कार्यक्रम नवी दिल्ली येथे १५ रोजी झाला. कुलगुरू शिंदे यांना नीती आयोगाचे उपाध्यक्ष डॉ. राजीव कुमार, क्यू.एस. रँकिंगचे उपाध्यक्ष जेसन न्यूमन यांच्या हस्ते प्रमाणपत्र प्रदान करून गौरवले. विद्यापीठाच्या इनोव्हेशन आणि इन्क्युबेशन केंद्र तशा अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे संचालक डॉ. आर. के. कामत उपस्थित होते. प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील आदी उपस्थित होते.

**"शिवाजी विद्यापीठाला संशोधनाची परंपरा आहे. विद्यापीठाने संशोधन क्षेत्रात स्वतंत्र स्थान निर्माण केले आहे. शिक्षक आणि विद्यार्थ्यांच्या संशोधनावर या मानांकनाने शिक्कामोर्तब झाले. जागतिक क्रमवारी निर्धारित करणाऱ्या यंत्रणेकडून जागतिक पातळीवर दखल घेतली जाणे ही आनंदाची बाब आहे. विद्यार्थ्यांना संशोधनासाठी प्रेरणा देणारी आहे.**

**- डॉ. देवानंद शिंदे,**

कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ

लोकमत

# 'शिवाजी द ग्रेट' ग्रंथाचे उद्या प्रकाशन

लोकमत न्यूज नेटवर्क


**कोल्हापूर :** शिवचरित्रकार प्राचार्य डॉ. बाळकृष्ण यांच्या 'शिवाजी द ग्रेट' या इंग्रजी महाग्रंथाच्या नूतन आवृत्तीचे प्रकाशन राजीव गांधी विज्ञान व तंत्रज्ञान आयोगाचे अध्यक्ष व अणुशास्त्रज्ञ पद्मविभूषण डॉ. अनिल काकोडकर यांच्या हस्ते उद्या, शुक्रवारी करण्यात येणार असल्याची माहिती शिवाजी विद्यापीठाच्या शाहू संशोधन केंद्राचे संचालक व ज्येष्ठ इतिहासतज्ज्ञ डॉ. जयसिंगराव पवार यांनी दिली.

डॉ. पवार यांनीच 'राजर्षी शाहू साहित्यमाले'च्या अंतर्गत या महाग्रंथाच्या नूतन आवृत्तीचे संपादन केले आहे. विद्यापीठाच्या वि. स. खांडेकर सभागृहात उद्या दुपारी तीन वाजता प्रकाशन समारंभ होईल. यावेळी शाहू छत्रपती प्रमुख उपस्थित असतील. कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली हा समारंभ होईल.

विद्यापीठाच्या सुवर्ण महोत्सवानिमित्त शाहू संशोधन केंद्रातर्फे या ग्रंथाचा संकल्प सोडला होता. प्रकाशन दिनी हा चार खंडांचा ग्रंथ अवघ्या ५०० रुपयांत उपलब्ध आहे. या संधीचा शिवप्रेमींनी लाभ घ्यावा, असे आवाहन डॉ. पवार व कुलसचिव नांदवडेकर यांनी केले.

## 'शिवाजी द ग्रेट'चे वैशिष्ट्य

डॉ. बाळकृष्णांच्या शिवचरित्राचे




प्रमुख वैशिष्ट्य म्हणजे ते मुख्यत: डच, पोर्तुगीज, इंग्लिश, फ्रेंच भाषांमधील कागदपत्रांवर आधारित आहे. विशेषत: हेग व बटव्हिया येथून त्यांनी खास तज्ज्ञांची नेमणूक करुन डच साधने मिळविली. डच साधने मिळवून शिवचरित्रात मोलाची भर घालणारे ते पहिले इतिहासकार आहेत. शिवाजी विद्यापीठाची स्थापना आणि शिवचरित्र ही बाळकृष्णांनी पाहिलेली दोन स्वप्ने होती. शिवचरित्राचे स्वप्न त्यांच्या हयातीत, तर विद्यापीठाचे स्वप्न त्यांच्या मृत्योपरांत साकार झाले, अशी माहिती पवार यांनी दिली.

# शिवाजी विद्यापीठात राष्ट्रीय कव्वाली स्पर्धा

## २२ ऑक्टोबरपासून सुरुवात : कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांची माहिती

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

भारतीय विद्यापीठ महासंघ (एआययू) आणि शिवाजी विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने तिसऱ्या राष्ट्रीय आंतरविद्यापीठ कव्वाली स्पर्धेचे आयोजन येत्या सोमवारपासून (दि. २२) विद्यापीठात करण्यात आले आहे. या दोनदिवसीय स्पर्धेचे उद्घाटन सोमवारी सकाळी १०.३० वाजता वि. स. खांडेकर भाषा भवनच्या सभागृहात एआययूचे सहसचिव डॉ. सॅम्पसन डेव्हीड यांच्या प्रमुख उपस्थितीत होईल, अशी माहिती कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

कुलगुरू डॉ. शिंदे यांनी दिलेल्या माहितीनुसार, गतवर्षी मुंबई येथे झालेल्या दुसऱ्या राष्ट्रीय आंतरविद्यापीठ स्पर्धेत शिवाजी विद्यापीठाच्या कव्वाली संघाने चमकदार कामगिरी करत विजेतेपद पटकावले होते. लावणी-पोवाड्याची परंपरा असलेल्या या



परिसरातील विद्यार्थ्यांनी हा एक प्रकारे इतिहास घडविला होता. त्यामुळे ही कव्वालीची परंपरा आणखी जोमाने पुढे जावी आणि स्थानिक विद्यार्थ्यांनाही त्यातून प्रेरणा मिळावी, यासाठी यंदाच्या तिसऱ्या राष्ट्रीय स्पर्धेचे यजमानपद भूषविण्याची इच्छा विद्यापीठाने एआययूकडे व्यक्त केली होती. त्यानुसार ही स्पर्धा शिवाजी विद्यापीठात आयोजित केली जात आहे.

स्पर्धेत देशभरातील आठ संघांनी नोंदणी केली आहे. सर्व स्पर्धा वि. स. खांडेकर भाषा भवनच्या सभागृहातच पार पडतील. समारोप समारंभ मंगळवारी (दि. २३) दुपारी ४ वाजता होईल. स्पर्धेच्या अनुषंगाने सर्व आवश्यक तयारी पूर्ण झाली आहे.

या स्पर्धेचे समन्वयक तथा विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव म्हणाले, स्पर्धेत सहभागी होणाऱ्या आठ संघांपैकी चार संघ महाराष्ट्रातील असून हरियाणा, पंजाब, राजस्थान व मध्य प्रदेश



या राज्यांमधून प्रत्येकी एक संघ सहभागी होणार आहे. स्पर्धेतील प्रथम तीन विजेत्यांना अनुक्रमे २५ हजार रुपये रोख, २० हजार रुपये रोख व १५ हजार रुपये रोख आणि चषक व प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. येणारे संघ, त्यांचे व्यवस्थापक, परीक्षक यांच्या निवासाची व्यवस्था विद्यार्थी भवन, पाच बंगला आणि विद्यापीठ अतिथीगृह या ठिकाणी करण्यात आली आहे, तर चहापान व भोजनाची मध्यवर्ती व्यवस्था लोककला केंद्र येथे करण्यात आली आहे.

पत्रकार परिषदेस प्र. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक महेश काकडे, वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील, इनोव्हेशन व इन्क्युबेशन सेंटरचे संचालक डॉ. आर. के. कामत यांच्यासह व्यवस्थापन परिषदेचे सदस्य संजय जाधव, ॲड. धैर्यशील पाटील, डॉ. रसूल कोरबू, डॉ. प्रकाश कुंभार आदी उपस्थित होते.

सकाळ

# जिल्हास्तरीय युवा महोत्सव २६पासून

## मध्यवर्ती महोत्सव ३१ ऑक्टोबरला

**कोल्हापूर, ता. १८ :** शिवाजी विद्यापीठाचा ३८ वा युवा महोत्सव २६ ऑक्टोबर ते ३१ ऑक्टोबर या कालावधीत होणार आहे. कोल्हापूर, सातारा, सांगली या जिल्ह्यातील युवा महोत्सव स्वतंत्रपणे होणार असून मध्यवर्ती युवा महोत्सव सांगलीमधील विलिंग्डन कॉलेजमध्ये ३१ ऑक्टोबरला होणार आहे, अशी माहिती कुलगुरू देवानंद शिंदे यांनी दिली.



प्राध्यापकांच्या आंदोलनामुळे सन २०१८-१९ मुळे युवा महोत्सव नियोजित कालावधीत न घेता तो पुढे ढकलण्यात आला होता. आज कुलगुरू देवानंद शिंदे यांनी याच्या तारखा जाहीर केल्या. सातारा येथे २६ ऑक्टोबरला कोरेगाव येथील डी. पी. भोसले महाविद्यालयात होणार आहे. कोल्हापुरातील युवा महोत्सव २७ ऑक्टोबरला महावीर महाविद्यालयात होईल. सांगली येथील युवा महोत्सव आटपाडीच्या श्रीमंत बाबासाहेब देशमुख महाविद्यालयात होईल. मध्यवर्ती युवा महोत्सवाचे ३१ ऑक्टोबरला सांगलीच्या विलिंग्डन महाविद्यालयात आयोजन करण्यात आले आहे. इंद्रधनुष्य व पश्चिम विभागीय युवा महोत्सव संघ निवड शिबीर विद्यापीठातील वि. स. खांडेकर भाषा भवन येथे ३ ते ४ नोव्हेंबर या कालावधीत होईल. १२ नोव्हेंबरपासूनच भाषा भवनातच याचे सराव शिबिर सुरू होईल. असे कुलगुरू देवानंद शिंदे यांनी सांगितले.

Kolhapur, Main1
18/10/2018 Page No. 3

लोकमत

# 'क्यू. एस.' रँकिंगमध्ये शिवाजी विद्यापीठ द्वितीय

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शैक्षणिक संस्थांच्या मूल्यांकनात जागतिक स्तरावर दबदबा असलेल्या ब्रिटिश 'क्यू. एस. वर्ल्ड युनिव्हर्सिटी' रँकिंगचे भारतीय संस्थांबाबतचे मानांकन सोमवारी (दि. १५) जाहीर झाले. त्यामध्ये देशात संशोधनाच्या क्षेत्रात मुंबईच्या इन्स्टिट्यूट ऑफ केमिकल टेक्नॉलॉजीने (आय. सी. टी.) प्रथम, तर कोल्हापूरच्या शिवाजी विद्यापीठाने दुसरा क्रमांक पटकाविला आहे.

कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे आणि इनोव्हेशन अँड इन्क्युबेशन सेंटरचे संचालक डॉ. आर. के. कामत यांनी बुधवारी येथे पत्रकार परिषदेत दिली. कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, क्यू. एस. वर्ल्ड युनिव्हर्सिटी रँकिंगच्या वतीने ब्रिक्स (ब्राझील, रशिया, भारत, चीन आणि दक्षिण आफ्रिका) देशांसाठी स्वतंत्र रँकिंग (क्यू. एस. ब्रिक्स इंडिया रँकिंग) घेण्याचे ठरविण्यात आले. या धोरणानुसार यावर्षी पहिल्यांदाच भारतातील शैक्षणिक संस्थांसाठी स्वतंत्रपणे क्रमवारी जाहीर केली. त्यामध्ये भारतातील सर्व शैक्षणिक संस्थांमध्ये शिवाजी विद्यापीठाची क्रमवारी ५६-६० अशी आहे. ब्रिक्स देशांतील शैक्षणिक संस्थांमध्ये ही क्रमवारी २५१-२६० अशी आहे.



**नवी दिल्लीमध्ये सोमवारी नीती आयोगाचे उपाध्यक्ष डॉ. राजीव कुमार आणि क्यू. एस. रँकिंगचे उपाध्यक्ष जेसन न्यूमन यांच्या हस्ते कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांना क्यू. एस. ब्रिक्स इंडिया रँकिंगचे प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले.**

डॉ. कामत म्हणाले, ही मानांकने ठरविताना शैक्षणिक लौकिक, संस्थेचा लौकिक व परंपरा, शिक्षक-विद्यार्थी गुणोत्तर, पीएच.डी.धारक शिक्षक, स्कोपस आकडेवारीनुसार प्रतिशिक्षक शोधप्रबंध, 'स्कोपस'नुसार शोधनिबंधांमधील उद्धृते (साईटेशन्स), आंतरराष्ट्रीय विद्यार्थ्यांचे प्रमाण आणि आंतरराष्ट्रीय शिक्षकांचे प्रमाण असे निकष निर्धारित करण्यात आले होते.

यातील संशोधनाशी निगडित निकषांवर विद्यापीठाने राष्ट्रीय स्तरावर द्वितीय स्थान मिळवून आपल्या संशोधनाची गुणवत्ता सिद्ध केली आहे. दरम्यान, नवी दिल्लीमध्ये सोमवारी कुलगुरू डॉ. शिंदे यांना नीती आयोगाचे उपाध्यक्ष डॉ. राजीव कुमार आणि क्यू. एस. रँकिंगचे उपाध्यक्ष जेसन न्यूमन यांच्या हस्ते प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले.

# शिवाजी विद्यापीठ संशोधनात देशात द्वितीय

## 'क्यू. एस.' रँकिंग मानांकन जाहीर




**कोल्हापूर : नीती आयोगाचे उपाध्यक्ष डॉ. राजीव कुमार आणि क्यू. एस. रँकिंगचे उपाध्यक्ष जेसन न्यूमन यांच्या हस्ते प्रमाणपत्र स्वीकारताना कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे.**

**कोल्हापूर :** संशोधनाच्या क्षेत्रात शिवाजी विद्यापीठाने राष्ट्रीय पातळीवर द्वितीय स्थान पटकावून या क्षेत्रातील आपले प्रभुत्व सिद्ध केले आहे. शैक्षणिक संस्थांच्या मूल्यांकनात जागतिक स्तरावर दबदबा असलेल्या ब्रिटिश 'क्यू. एस. वर्ल्ड युनिव्हर्सिटी' रँकिंगचे भारतीय संस्थांच्या संदर्भातील मानांकन १५ ऑक्टोबर रोजी जाहीर करण्यात आले. त्यामध्ये शिवाजी विद्यापीठाची संशोधन क्षेत्रातील आघाडी अधोरेखित झाली आहे.

'क्यू. एस. वर्ल्ड युनिव्हर्सिटी रँकिंग'तर्फे 'ब्रिक्स' (ब्राझील, रशिया, भारत, चीन आणि दक्षिण आफ्रिका) देशांसाठी स्वतंत्र रँकिंग (क्यू. एस. ब्रिक्स इंडिया रँकिंग) घेण्याचे ठरविण्यात आले आहे. या धोरणानुसार, यंदा प्रथमच भारतातील शैक्षणिक संस्थांसाठी स्वतंत्रपणे क्रमवारी जाहीर करण्यात आली. यामध्ये देशातील सर्व शैक्षणिक संस्थांमध्ये शिवाजी विद्यापीठाची क्रमवारी ५६-६० अशी आहे, तर 'ब्रिक्स' देशांतील शैक्षणिक संस्थांमध्ये ही क्रमवारी २५१-२६० अशी आहे. ही मानांकने ठरविताना शैक्षणिक लौकिक (३० टक्के), संस्थेचा लौकिक व परंपरा (२० टक्के), शिक्षक-विद्यार्थी गुणोत्तर (२० टक्के), ▶▶ पान ७ वर..

# शिवाजी विद्यापीठ संशोधनात देशात द्वितीय

पीएच.डी.धारक शिक्षक (१० टक्के), स्कोपस आकडेवारीनुसार प्रतिशिक्षक शोधप्रबंध (१० टक्के), 'स्कोपस'नुसार शोधनिबंधांमधील उद्धृते (साइटेशन्स) (५ टक्के), आंतरराष्ट्रीय विद्यार्थ्यांचे प्रमाण (२.५ टक्के) आणि आंतरराष्ट्रीय शिक्षकांचे प्रमाण (२.५ टक्के) असे निकष निर्धारित करण्यात आले होते. यातील संशोधनाशी निगडित निकषांवर शिवाजी विद्यापीठाने राष्ट्रीय स्तरावर द्वितीय स्थान मिळवून आपल्या संशोधनाची गुणवत्ता सिद्ध केली आहे. या निकषांवर मुंबईच्या इन्स्टिट्यूट ऑफ केमिकल टेक्नॉलॉजीने (आय.सी.टी.) प्रथम स्थान पटकावले आहे. या रँकिंगच्या प्रमाणपत्र प्रदानाचा कार्यक्रम नवी दिल्ली येथे १५ ऑक्टोबर रोजी झाला. शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांना नीती आयोगाचे उपाध्यक्ष डॉ. राजीव कुमार आणि क्यू. एस. रँकिंगचे उपाध्यक्ष जेसन न्यूमन यांच्या हस्ते प्रमाणपत्र प्रदान करून गौरविण्यात आले. यावेळी विद्यापीठाच्या इनोव्हेशन आणि इन्क्युबेशन केंद्राचे तथा अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे संचालक डॉ. आर. के. कामत उपस्थित होते.

## विद्यापीठाच्या संशोधन परंपरेचा सन्मान

शिवाजी विद्यापीठातील शिक्षक तसेच संशोधकांनी आपल्या संशोधनपर कार्यांचा ठसा जागतिक स्तरावर उमटवलेला आहे, यावर वेळोवेळी केल्या जाणाऱ्या सर्वेक्षणातून शिक्कामोर्तब झाले आहे. आता या दर्जावर 'क्यू. एस.' रँकिंगची मोहोर उमटल्याने त्याला एक वेगळे महत्त्व प्राप्त झाले आहे. ही बाब विद्यापीठातील तसेच विद्यापीठ परिक्षेत्रातील संशोधकांसाठी अत्यंत प्रेरणादायी स्वरूपाची असून या पुढील काळातही या क्षेत्रातील विद्यापीठाची आघाडी टिकवण्याच्या दृष्टीने अधिकाधिक दर्जेदार संशोधन होत राहील.

**- कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे**

पुढारी

# छत्रपती शिवाजी महाराज पुरस्कार संदर्भात उद्या बैठक

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाच्या वतीने यावर्षीपासून दिल्या जाणाऱ्या छत्रपती शिवाजी महाराज पुरस्कारासंदर्भात शुक्रवारी (दि. १९) सकाळी ११ वाजता बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे. बैठकीस विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

यामध्ये दैनिक 'पुढारी'चे मुख्य संपादक डॉ. प्रतापसिंह जाधव, ज्येष्ठ अणुशास्त्रज्ञ डॉ. अनिल काकोडकर, ज्येष्ठ साहित्यीक नागनाथ कोतापल्ले, ज्येष्ठ लेखिका पुष्पा भावे, ज्येष्ठ इतिहासतज्ज्ञ डॉ. जयसिंगराव पवार, नाबार्डचे माजी अध्यक्ष डॉ. यशवंत थोरात आणि डिक्कीचे अध्यक्ष मिलिंद कांबळे आदी मान्यवरांचा सहभाग असणार आहे. या बैठकीत पुरस्काराचे स्वरुप व इतर अनुषंगिक नियोजन याबाबत चर्चा होणार असल्याची माहिती कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी बुधवारी पत्रकार परिषदेत दिली.




# विद्यापीठात २२ पासून राष्ट्रीय कव्वाली स्पर्धा

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

भारतीय विद्यापीठ महासंघ (ए.आय.यू.) आणि शिवाजी विद्यापीठ यांच्या वतीने तिसऱ्या राष्ट्रीय आंतर-विद्यापीठ कव्वाली स्पर्धेचे आयोजन सोमवारपासून (दि. २२) विद्यापीठात करण्यात येणार आहे. या दोन दिवसीय राष्ट्रीय स्पर्धेचे उद्घाटन सोमवारी सकाळी १०.३० वा. वि. स. खांडेकर भाषा भवनच्या सभागृहात ए.आय.यू. चे सहसचिव डॉ. सॅम्पसन डेव्हीड यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार असल्याची माहिती कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी बुधवारी पत्रकार परिषदेत दिली.

कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, गतवर्षी मुंबई येथे झालेल्या दुसऱ्या राष्ट्रीय आंतर-विद्यापीठ स्पर्धेत शिवाजी विद्यापीठाच्या कव्वाली संघाने चमकदार कामगिरी करीत विजेतेपद पटकावले होते. लावणी-पोवाड्याची परंपरा असलेल्या या परिसरातील विद्यार्थ्यांनी हा एक प्रकारे इतिहास घडविला होता.

## कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांची माहिती

त्यामुळे ही कव्वालीची परंपरा आणखी जोमाने पुढे जावी आणि स्थानिक विद्यार्थ्यांनाही त्यातून प्रेरणा मिळावी. यासाठी यंदाच्या तिसऱ्या राष्ट्रीय स्पर्धेचे यजमानपद भूषविण्याची इच्छा विद्यापीठाने ए.आय.यू. कडे व्यक्त केली होती. त्यानुसार, ही स्पर्धा शिवाजी विद्यापीठात आयोजित केली जात आहे. स्पर्धेत देशभरातील एकूण आठ संघांनी नोंदणी केली आहे. स्पर्धेचा सांगता कार्यक्रम मंगळवारी (दि. २३) सायंकाळी ४ वाजता होईल. विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव म्हणाले, स्पर्धेत सहभागी होणाऱ्या आठ संघांपैकी चार संघ महाराष्ट्रातील असून हरियाणा, पंजाब, राजस्थान व मध्य प्रदेश या राज्यांमधून प्रत्येकी एक संघ सहभागी होणार आहे. अशा प्रकारची राष्ट्रीय कव्वाली स्पर्धा ही कोल्हापूरमध्ये प्रथमच होत असून, त्याचा रसिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहनही त्यांनी केले आहे. पत्रकार परिषदेस प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक महेश काकडे, वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील, इनोव्हेशन व इन्क्युबेशन सेंटरचे संचालक डॉ. आर. के. कामत आदींसह व्यवस्थापन परिषदेचे सदस्य संजय जाधव, ॲड. धैर्यशील पाटील, डॉ. रसूल कोरबू, डॉ. प्रकाश कुंभार आदी उपस्थित होते.

पुढारी

# विद्यापीठात शनिवारी माजी विद्यार्थी मेळावा

**कोल्हापूर (प्रतिनिधी) :** शिवाजी विद्यापीठातील माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा शनिवारी (दि. २०) आयोजित करण्यात आला आहे. या मेळाव्यात माजी विद्यार्थ्यांनी एकमेकांशी संवाद साधावा, तसेच आपण आपले त्यावेळचे अनुभव एकमेकांना पुन्हा एकदा सांगावेत, तसेच विद्यापीठाविषयी असणारी आपली कृतज्ञता व्यक्त करण्यासाठीही हे व्यासपीठ महत्त्वाचे असणार आहे. वि. स. खांडेकर भाषा भवन येथे सकाळी ११.३० वाजता मेळावा होणार आहे. या मेळाव्यास सर्वांनी उपस्थित राहावे, असे आवाहन कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी केले आहे.

पुढारी

# छत्रपती शिवाजी महाराज पुरस्कार संदर्भात उद्या बैठक

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाच्या वतीने यावर्षीपासून दिल्या जाणाऱ्या छत्रपती शिवाजी महाराज पुरस्कारासंदर्भात शुक्रवारी (दि. १९) सकाळी ११ वाजता बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे. बैठकीस विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

यामध्ये दैनिक 'पुढारी'चे मुख्य संपादक डॉ. प्रतापसिंह जाधव, ज्येष्ठ अणुशास्त्रज्ञ डॉ. अनिल काकोडकर, ज्येष्ठ साहित्यीक नागनाथ कोतापल्ले, ज्येष्ठ लेखिका पुष्पा भावे, ज्येष्ठ इतिहासतज्ज्ञ डॉ. जयसिंगराव पवार, नाबार्डचे माजी अध्यक्ष डॉ. यशवंत थोरात आणि डिक्कीचे अध्यक्ष मिलिंद कांबळे आदी मान्यवरांचा सहभाग असणार आहे. या बैठकीत पुरस्काराचे स्वरुप व इतर अनुषंगिक नियोजन याबाबत चर्चा होणार असल्याची माहिती कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी बुधवारी पत्रकार परिषदेत दिली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
1 9 OCT 2018
महाराष्ट्र टाईम्स

# 'शिवाजी द ग्रेट' पुस्तकाचे उद्या प्रकाशन

**कोल्हापूर टाइम्स टीम**

महान शिवचरित्रकार, दिवंगत प्राचार्य डॉ. बाळ कृष्ण यांच्या 'शिवाजी द ग्रेट' या इंग्रजी महाग्रंथाच्या नूतन आवृत्तीचे प्रकाशन महाराष्ट्राच्या राजीव गांधी विज्ञान व तंत्रज्ञान आयोगाचे अध्यक्ष व अणुशास्त्रज्ञ पद्मविभूषण डॉ. अनिल काकोडकर यांच्या हस्ते होणार आहे. शुक्रवारी (ता. १९ ऑक्टोबर) हा कार्यक्रम होणार आहे.

शिवाजी विद्यापीठाच्या शाहू संशोधन केंद्राचे संचालक व ज्येष्ठ इतिहासतज्ज्ञ डॉ. जयसिंगराव पवार यांनी ही माहिती दिली. विद्यापीठाच्या वि. स. खांडेकर सभागृहात दुपारी ३ वाजता प्रकाशन समारंभ होईल. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी असतील.

प्रकाशन दिनी हा चार खंडांचा ग्रंथ अवघ्या ५०० रुपयांत उपलब्ध करण्यात येणार आहे. यावेळी श्रीमंत शाहू महाराज छत्रपती यांची प्रमुख उपस्थिती असेल असे सांगून डॉ. पवार म्हणाले, 'सुमारे ७५ वर्षांपूर्वी शिवाजी विद्यापीठाच्या स्थापनेचे भव्य स्वप्न पाहणाऱ्या डॉ. बाळ कृष्ण यांच्या 'शिवाजी द ग्रेट' हा महाग्रंथ वैशिष्ट्यपूर्ण आहे. शिवचरित्राने भारावलेल्या डॉ. बाळ कृष्ण यांनी आयुष्याच्या उत्तरार्धात या महाग्रंथाचा संकल्प सोडला. १९३२ ते १९४० या कालावधीत त्यांनी या चार खंडांत विभागलेल्या सुमारे १६३५ पृष्ठसंख्येच्या महाग्रंथाचे लेखन पूर्ण केले. त्यांनी दम्यासारख्या रोगाशी झुंज देत आपले लेखनकार्य पूर्ण केले. नंतर काही काळातच त्यांचे निधन झाले. हे शिवचरित्र डच, पोर्तुगीज, इंग्लिश, फ्रेंच आदी युरोपियन भाषांमधील कागदपत्रांवर आधारित आहे.'

या कार्यक्रमाला सर्वांनी उपस्थित रहावे असे आवाहन करण्यात आले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
18 OCT 2018
महाराष्ट्र टाईम्स

# विद्यापीठात सोमवारपासून राष्ट्रीय कव्वाली स्पर्धा

**कोल्हापूर :** भारतीय विद्यापीठ महासंघ (एआययू) आणि येथील शिवाजी विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने तिसऱ्या राष्ट्रीय आंतर-विद्यापीठ कव्वाली स्पर्धेचे आयोजन सोमवारपासून (२२ ऑक्टोबर) विद्यापीठात करण्यात आले आहे.

स्पर्धेचे उद्घाटन सोमवारी सकाळी साडेदहा वाजता वि.स. खांडेकर भाषा भवनच्या सभागृहात एआययूचे सहसचिव डॉ. सॅम्पसन डेव्हीड यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे. स्पर्धेत देशभरातील एकूण आठ संघांनी नोंदणी केली आहे. सर्व स्पर्धा भाषा भवनच्या सभागृहात पार पडतील. समारोप समारंभ मंगळवारी (ता. २३) सायंकाळी ४ वाजता होईल.

विजेत्यांना अनुक्रमे २५ हजार, २० हजार व १५ हजार रुपये रोख आणि चषक व प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. अशा प्रकारची स्पर्धा कोल्हापुरात पहिल्यांदाच होत असल्याचे स्पर्धा समन्वयक आर. व्ही. गुरव यांनी सांगितले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
19 OCT 2018
महाराष्ट्र टाईम्स

# युवा महोत्सव २६ पासून

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाच्या युवा महोत्सवास २६ ऑक्टोबरपासून सुरूवात होणार आहे. सप्टेंबरमध्ये प्राध्यापकांनी पुकारलेल्या संपामुळे महोत्सव स्थगित केला होता. मात्र आता बदललेल्या वेळापत्रकानुसार पूर्वनियोजित केंद्रांमध्ये जिल्हानिहाय व मध्यवर्ती युवा महोत्सव होणार आहे.

२६ ऑक्टोबर रोजी सातारा जिल्हास्तरीय महोत्सव कोरेगाव येथील बी. पी. भोसले महाविद्यालयात तर कोल्हापूर जिल्हास्तरीय महोत्सव महावीर कॉलेजमध्ये २७ ऑक्टोबरला होणार आहे. सांगलीचा महोत्सव आटपाडीच्या बाबासाहेब देशमुख कॉलेजमध्ये २९ रोजी होणार आहे.

मध्यवर्ती युवा महोत्सव ३१ ऑक्टोबर ते २ नोव्हेंबरदरम्यान सांगलीच्या विलिंग्डन कॉलेजमध्ये होणार आहे. त्यापुढील स्तरावर होणाऱ्या राज्यस्तरीय महोत्सवातील इंद्रधनुष्य व पश्चिम महाराष्ट्र युवा महोत्सवासाठी ३ ते ४ नोव्हेंबरदरम्यान निवड शिबिराचे आयोजन केले आहे. शिबिरात निवडण्यात आलेल्या विद्यार्थ्यांचे सराव शिबिर १२ नोव्हेंबरला होणार आहे.



## माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा २० रोजी

दरम्यान, विद्यापीठाच्या माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा शनिवार, ता. २० रोजी आयोजित करण्यात आला आहे. विविध क्षेत्रात कार्यरत असलेल्या विद्यार्थ्यांना एकत्र आणून त्यांच्यात संवाद घडावा, या हेतूने स्नेहमेळावा होणार आहे. वि. स.खांडेकर भाषा भवन सभागृहात सकाळी साडेअकरा वाजता उद्घाटन होणार आहे. विद्यापीठाच्या विकासासाठी सृजनशील संकल्पना व विचारांचे आदानप्रदान करण्यासाठी मेळाव्याच्या निमित्ताने व्यासपीठ उपलब्ध करून देण्यात येईल.

18 OCT 2018

Times of India

जनसंपर्क कक्ष

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# IIT-Bombay is No. 1 in QS India rankings, Mumbai university 14th

Times News Network

**New Delhi/Mumbai:** The Indian Institute of Technology, Bombay has topped the first standalone Quacquarelli Symonds (QS) rankings for Indian institutions, followed by IIT Madras and the Indian Institute of Science (IISc), Bengaluru. Seven IITs have been ranked in the top ten and also the University of Hyderabad and Delhi university. Mumbai university, ranked 14, is the top public university in Maharashtra. The varsity had not made it to the top 100 in the NIRF rankings.


In the QS list, 75 top Indian institutions have been named. IISc was adjudged India's best institution in the QS World University Rankings released earlier this year. But the domestic league has seen IIT-Bombay getting top rank. On the difference in rankings of Indian institutions in the domestic and international tables, the QS organisation explained that the performance criteria for Indian university rankings were the same as for QS BRICS rankings.

In global rankings, academic reputation carries 40% weightage, but in the Indian edition it carries 30%. The World University Rankings focus on research impact (citations per faculty) and the domestic league looks at research productivity (number of papers per faculty). After China, India University Rankings is the second country-specific ranking done by QS. The group is looking at Japan and South Korea next.


Only two universities—Delhi and Hyderabad—are non-technical institutes in the top ten, while Birla Institute of Science and Technology is the only private institution in the top 20.

"We are delighted. We work to the best of our abilities with the resources we have in terms of teachers, students and funds. We keep our focus on research and continue with good academics and teaching and everything else falls in place," said Swati Patankar, dean, international relations, IIT-Bombay.

Suhas Pednekar, vice-chancellor, Mumbai University, said, "We are happy and will strive to improve our ranking. We want to concentrate more in the field of artificial intelligence and are going to establish the Incubation Center with the help of the Maharashtra government to promote entrepreneurship."



TOI



Savitribai Phule Pune University and (top) IIT-Bombay

## Pune university ranked 19th in India

**Pune:** The Savitribai Phule Pune University (SPPU) was unable to rise from its ranking level of 801-1000 in the Quacquarelli Symonds (QS) World University rankings 2019. However, in a separate ranking for Indian universities, SPPU bagged the 19th rank with an overall score of 43.1. The separate ranking list was declared by the think tank for the first time. The scores are out of 100 and have been derived from various parameters such as Academic reputation (30%), Employer reputation (20%), Faculty-student ratio (20%), Staff with a PhD (10%), Papers per faculty (10%), Citations per paper (5%), International faculty (2.5%) and International students (2.5%).

"We do not participate in QS ranking and the data is collected by QS from websites or other mediums. I have not gone through the data to comment on the matter in depth. However, I have learnt that we placed fifth among the state universities based on the data collected by them. We do not agree with it but, as I said, we have not furnished any data based on which they have calculated our ranking. We don't think this matters much," vice chancellor of SPPU Nitin Karmalkar said. TNN

18 OCT 2018

तरूण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर


# संशोधनात शिवाजी विद्यापीठ देशात द्वितीय

## कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांची माहिती : जागतिक 'क्यू. एस.' रँकिंगमधील मानांकन जाहीर

प्रतिनिधी
कोल्हापूर

संशोधनाच्या क्षेत्रात शिवाजी विद्यापीठाने राष्ट्रीय पातळीवर द्वितिय स्थान पटकावून या क्षेत्रातील आपले प्रभुत्व सिद्ध केले आहे. शैक्षणिक संस्थांच्या मूल्यांकनात जागतिक स्तरावर दबदबा असलेल्या ब्रिटीश 'क्यू. एस. वर्ल्ड युनिव्हर्सिटी' रँकिंगचे भारतीय संस्थांच्या संदर्भातील मानांकन नुकतेच जाहीर झाले. त्यामध्ये शिवाजी विद्यापीठाची संशोधन क्षेत्रातील घोडदौड अधोरेखित झाली आहे.

इनोव्हेशन आणि इन्क्युबेशन केंद्राचे तथा अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे संचालक डॉ. आर. के. कामत म्हणाले, 'क्यू. एस. वर्ल्ड युनिव्हर्सिटी' रँकिंगच्या वतीने 'ब्रिक्स' (ब्राझील, रशिया, भारत, चीन आणि दक्षिण आफ्रिका) देशांसाठी स्वतंत्र रँकिंग (क्यू.एस. ब्रिक्स इंडिया रँकिंग) घेण्याचे ठरविले आहे. या धोरणानुसार यंदा प्रथमच भारतातील शैक्षणिक संस्थांसाठी स्वतंत्रपणे क्रमवारी जाहीर केली. यामध्ये भारतातील सर्व शैक्षणिक संस्थांमध्ये शिवाजी विद्यापीठाची क्रमवारी ५६-६० अशी आहे; तर 'ब्रिक्स' देशांतील शैक्षणिक संस्थांमध्ये



कोल्हापूर : नीती आयोगाचे उपाध्यक्ष डॉ. राजीव कुमार आणि क्यू. एस. रँकिंगचे जेसन न्यूमन यांच्या हस्ते क्यू. एस. रँकिंगचे प्रमाणपत्र स्वीकारताना कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे.

ही क्रमवारी २५१-२६० अशी आहे. ही मानांकने ठरविताना शैक्षणिक लौकिक (३० टक्के), संस्थेचा लौकिक व परंपरा (२० टक्के), शिक्षक-विद्यार्थी गुणोत्तर (२० टक्के), पीएचडीधारक शिक्षक (१० टक्के), स्कोपस आकडेवारीनुसार प्रतिशिक्षक शोधप्रबंध (१० टक्के), 'स्कोपस'नुसार शोधनिबंधांमधील उद्धृते (साईटेशन्स) (५ टक्के), आंतरराष्ट्रीय विद्यार्थ्यांचे प्रमाण (२.५ टक्के) आणि आंतरराष्ट्रीय शिक्षकांचे प्रमाण (२.५ टक्के) असे निकष निर्धारित केले होते. यातील संशोधनाशी निगडित निकषांवर शिवाजी विद्यापीठाने राष्ट्रीय स्तरावर द्वितिय स्थान मिळवून आपल्या संशोधनाची गुणवत्ता सिद्ध केली आहे. या निकषांवर मुंबईच्या इन्स्टिट्यूट ऑफ केमिकल टेक्नॉलॉजीने (आय.सी.टी.) प्रथम स्थान पटकावले आहे.

नवी दिल्ली येथे झालेल्या रँकिंगच्या प्रमाणपत्र प्रदान सोहळ्यासाठी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे उपस्थित होते. त्यांना नीती आयोगाचे उपाध्यक्ष डॉ. राजीव कुमार आणि क्यू. एस. रँकिंगचे उपाध्यक्ष जेसन न्यूमन यांच्या हस्ते प्रमाणपत्र प्रदान करून गौरविले. यावेळी विद्यापीठाच्या इनोव्हेशन आणि इन्क्युबेशन केंद्राचे तथा अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे संचालक डॉ. आर. के. कामत उपस्थित होते.

**विद्यापीठाच्या संशोधन परंपरेचा सन्मान : कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे**

जागतिक संशोधन संस्थांच्या क्रमवारीत 'थिंक टँक' म्हणून प्रसिद्ध असणाऱ्या ब्रिटनच्या 'क्यू.एस. वर्ल्ड युनिव्हर्सिटी' रँकिंगमध्ये शिवाजी विद्यापीठाच्या संशोधनाचा गौरव होणे हा संशोधन परंपरेचा सन्मान आहे. विद्यापीठ संशोधन कार्याची नोंद प्रथमच एका जागतिक क्रमवारीत निर्धारित करणाऱ्या यंत्रणेमार्फत घेतली याचा आनंद आहे. या क्षेत्रातील विद्यापीठाची आघाडी टिकविण्याच्या दृष्टीने अधिकाधिक दर्जेदार संशोधन होत राहील, असा विश्वासही कुलगुरू डॉ. शिंदे यांनी व्यक्त केला.

18 OCT 2018

महाराष्ट्र टाईम्स

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# संशोधनात सीमोल्लंघन

## संशोधन क्षेत्रात शिवाजी विद्यापीठ देशात दुसऱ्या क्रमांकावर

**म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर**

'शैक्षणिक संस्थांच्या मूल्यांकनात जागतिक स्तरावर प्रतिष्ठेच्या मानल्या जाणाऱ्या ब्रिटीश क्यूएस वर्ल्डने केलेल्या क्रमवारीत शिवाजी विद्यापीठाने संशोधनक्षेत्रात राष्ट्रीय पातळीवर द्वितीय स्थान पटकावले आहे. ब्रिटीश 'क्यूएसवर्ल्ड युनिव्हर्सिटी' रँकिंगचे भारतीय संस्थांच्या संदर्भातील मानांकन १५ ऑक्टोबरला जाहीर करण्यात आले. त्यात शिवाजी विद्यापीठाची संशोधन क्षेत्रातील आघाडी अधोरेखित झाली आहे,' अशी माहिती शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

नवी दिल्ली येथे झालेल्या कार्यक्रमात नीती आयोगाचे उपाध्यक्ष डॉ. राजीव कुमार आणि क्यूएस रँकिंगचे उपाध्यक्ष जेसन न्यूमन यांच्या हस्ते क्यूएस रँकिंगचे प्रमाणपत्र कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांना प्रदान करण्यात आले. यावेळी विद्यापीठाच्या इनोव्हेशन आणि इन्क्युबेशन केंद्र तसेच अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे संचालक डॉ. आर. के. कामत उपस्थित होते.

या मानांकनाबाबत माहिती देताना डॉ. शिंदे म्हणाले, 'क्यूएस वर्ल्ड युनिव्हर्सिटी रँकिंग'च्या वतीने 'ब्रिक्स' (ब्राझील, रशिया, भारत, चीन आणि दक्षिण आफ्रिका) देशांसाठी स्वतंत्र रँकिंग (क्यूएस ब्रिक्स इंडिया रँकिंग) घेण्याचे ठरविण्यात आले आहे. या धोरणानुसार यंदा प्रथमच भारतातील शैक्षणिक संस्थांसाठी स्वतंत्रपणे क्रमवारी जाहीर करण्यात आली. यात भारतातील सर्व शैक्षणिक संस्थांमध्ये शिवाजी विद्यापीठाची क्रमवारी ५६-६० अशी आहे, तर, 'ब्रिक्स' देशांतील शैक्षणिक संस्थांमध्ये ही क्रमवारी २५१-२६० अशी आहे.'

मानांकने ठरविताना शैक्षणिक लौकिक (३०%), संस्थेचा लौकिक व परंपरा (२०), शिक्षक-विद्यार्थी गुणोत्तर (२०), पीएचडीधारक शिक्षक (१०), स्कोपस आकडेवारीनुसार प्रतिशिक्षक शोधप्रबंध (१०), 'स्कोपस'नुसार शोधनिबंधांमधील उपयोजिता (५), आंतरराष्ट्रीय विद्यार्थ्यांचे प्रमाण (२.५) आणि आंतरराष्ट्रीय शिक्षकांचे प्रमाण (२.५%) असे निकष निर्धारित करण्यात आले होते. यातील संशोधनाशी निगडित निकषांवर शिवाजी विद्यापीठाने राष्ट्रीय स्तरावर द्वितीय स्थान मिळवून संशोधनाची गुणवत्ता सिद्ध केली आहे. या निकषांनुसार मुंबईच्या इन्स्टिट्यूट ऑफ केमिकल टेक्नॉलॉजीने (आयसीटी) प्रथम स्थान पटकावल्याचे डॉ. शिंदे यांनी सांगितले.

पत्रकार परिषदेस प्र-कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक महेश काकडे, वित्त व लेखाधिकारी व्ही.टी. पाटील, इनोव्हेशन व इन्क्युबेशन सेंटरचे संचालक डॉ. आर.के. कामत यांच्यासह व्यवस्थापन परिषदेचे सदस्य संजय जाधव, ॲड. धैर्यशील पाटील, डॉ. रसूल कोरबू, डॉ. प्रकाश कुंभार आदी उपस्थित होते.



नीती आयोगाचे उपाध्यक्ष डॉ. राजीव कुमार आणि क्यू.एस. रँकिंगचे उपाध्यक्ष जेसन न्यूमन यांच्या हस्ते क्यू.एस. रँकिंगचे प्रमाणपत्र स्वीकारताना शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे.

### संशोधन परंपरेचा गौरव

जागतिक संशोधन संस्थांच्या क्रमवारीच्या क्षेत्रात 'थिंक टँक' म्हणून प्रसिद्ध असणाऱ्या ब्रिटनच्या 'क्यूएस वर्ल्ड युनिव्हर्सिटी' रँकिंगमध्ये विद्यापीठाच्या संशोधनाचा गौरव होणे हा संशोधन परंपरेचा सन्मान आहे. या निमित्ताने विद्यापीठाची नोंद प्रथमच जागतिक क्रमवारी निर्धारित करणाऱ्या यंत्रणेमार्फत घेण्यात आली.

**“ हा सन्मान विद्यापीठातील तसेच विद्यापीठ परिक्षेत्रातील संशोधकांसाठी अत्यंत प्रेरणादायी आहे. या पुढील काळातही या क्षेत्रातील विद्यापीठाची आघाडी टिकविण्याच्या दृष्टीने अधिकाधिक दर्जेदार संशोधन करण्यावर भर देण्यात येणार आहे.**

**- डॉ. देवानंद शिंदे,** कुलगुरू